प्रकरण सहावे

प्रास्ताविक

रंगभूमी हे नियतकालिक मराठी नाट्यसृष्टीच्या सर्वांगीण विकासाचे दिशादिग्दर्शन करण्यासाठी अवतरले होते. अशा नियतकालिकात साहजिकच, मराठी नाटकांच्या परीक्षणाला अधिक महत्त्व आहे; असावयास हवे.परंतु येथे,थोडीशी आश्चर्याची गोष्ट अशी दिसते,की, मराठी नाटकांच्या संहिता किंवा प्रयोग यांवर या नियतकालिकात खूप लिहिले गेले असले तरी, विस्तृत, सखोल परीक्षणे ज्याला म्हणता येईल, असे लेख कमी आहेत. समकालीन नाटकांवर मते व्यक्त करणे ही गोष्ट अवघड असते,पण ती आवश्यकही असते.म्हणून या नियतकालिकाने,मराठी नाटकांची सखोल परीक्षणे प्रसिद्ध करावयास हवी होती असे वाटते, जे लेख 'परीक्षण' या संज्ञेच्या जवळपास जाऊ शकतील अशा लेखांमधून काही निवड करून त्याबाबतचे आपले विचार व्यक्त करावेत असे येथे ठरविले आहे.एखाद्या नाटकाच्या एखाद्याच पैलूचा विशेष स्पष्ट करणारे लेख विवेचनासाठी घेतलेले नाहीत.लेखातील आशयाची गुणवत्ता, मराठी नाट्येतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाची असलेली नाटके यांकडे प्रथम लक्ष वळवून त्यावर कमी- अधिक सविस्तर लिहिले आहे. इतर सर्वसामान्य लेखांचा आढावा घेतला आहे .आणि काही नाटकांचा फक्त उल्लेख प्रकरणाच्या शेवटी सूचीत केला आहे.

(१) कीचकवध

' कीचकवध' हे कृ.प्र.खाडिलकर यांचे अतिशय गाजलेले नाटक आहे. खाडिलकरांच्या सर्वोत्कृष्ट नाटकात आजही या नाटकाचा अंतर्भाव करावा लागतो. या नाटकातील नाट्यमूल्यावर लक्ष केंद्रित करून त्याची वाङ् मयीन समीक्षा केली तर तत्कालीन राजकारणाचा संदर्भ बाजूला ठेवूनही हे नाटक मनाची पकड घेणारे आहे असे प्रत्ययाला येते. म्हणून रंगभूमी मासिकाच्या पहिल्याच म्हणजे ऑगस्ट 1907 च्या अंकात 'स्फूटविवेचन' या सदरात या नाटकाविषयी जी चर्चा आलेली आहे त्यात 'कीचकवध' कसे पारखले गेले आहे याचा अभ्यास महत्वाचा ठरतो.

कृ.प्र.खाडिलकर यांचे हे गद्य, पौराणिक कथानक असलेले नाटक पुण्याच्या महाराष्ट्र नाटक मंडळीने रंगभूमीवर आणले. 1904 मध्ये महाराष्ट्र नाटक मंडळी, काही उच्च ध्येय मनाची बाळगून स्थापन झाली. या मंडळीने 'कीचकवध'चा पहिला प्रयोग पुण्याच्या विजयानंद थिएटरात 23 फेब्रुवारी 1907 मध्ये केला. सुरुवातीपासूनच हे नाटक लोकांनी उचलून धरले होते.प्रयोग चालू होते तरी त्याच्या तालमीही सुरू होत्या.अशा या, त्याकाळी गाजत असलेल्या, नाटकावर सहा महिन्यांनी रंगभूमी मासिकाच्या पहिल्या अंकात अभिप्राय न येता तरच नवल. 1907 मध्येच हे नाटक पुस्तकरूपानेही बाहेर आले. 20 मे 1907 ला पुण्याला भरलेल्या तिसऱ्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद कृ.प्र.खाडीलकर यांना मिळाले. या घटना खाडिलकरांचा आणि 'कीचकवधा'चा प्रभाव दर्शविण्याच्या दृष्टीने पुरेशा बोलक्या आहेत.

'कीचकवध' चे पौराणिक कथानकः

खाडिलकरांची नाटके प्राधान्याने पौराणिक कथाभागावर आधारलेली आहेत.नाटकाच्या बांधणीमध्ये कथानकाची निवड फार महत्त्वाची असते. कारण मूळ कथानकात जर नाट्यबीज नसेल तर नाटक उभे राहू शकत नाही. मुळात नाट्यबीज असायला हवे, ते शोधण्याची कलावंताची नजर असायला हवी आणि नाट्यमय प्रसंगांची निर्मिती करण्यासाठी प्रतिभाशक्तीही हवी.'कीचकवध'मध्ये हे सारे घडून आलेले दिसते.

कौरवांबरोबर द्यूतात हरल्यानंतर पांडवांना बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास स्वीकारावा लागला. वनवासाची बारा वर्षे संपल्यानंतर पांडव विराटराजाच्या मत्स्य देशात वेष पालटून येऊन राहिले. धर्म, कंकभट या नावाने विराटराजा जवळ राहिला. भीष्म,बलवाचार्य या नावाने मुदपाकखन्यात आचारी झाला. अर्जुन,बृहन्नडा बनून नृत्यशाळेत नाच शिकू लागला.नकुल -सहदेव, विराटाच्या अश्वशाळेत घोड्यांची निगा दाखू लागले आणि सैरंध्री हे नाव घेऊन द्रौपदी, विराटाची राणी सुदेष्णा हिची दासी म्हणून राहिली. सुदेष्णा,ही कीचकाची मानलेली बहीण.विराटाचे राज्य कीचकाच्या पराक्रमावर चाललेले होते. स्वतः विराट सज्जन पण दुबळा राजा होता. कीचक सामर्थ्यवान पण जुलमी होता. अशा कीचकाच्या दृष्टीला रूपवान सैरंध्री पडली आणि तिच्या रक्षणासाठी भीमाने कीटकाचा वध केला. एवढे हे मूळ कथानक.हे कथानक दृष्टीपुढे आल्यावर खाडिलकरांच्या मनात कोणत्या आकृती उमटल्या असतील? मुळात नाटककार खाडीलकराना हे कथानक का आठवले असेल? हे कथानक निवडले गेले यामागे केवळ नाटककार खाडिलकरांचे मन होते की त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या इतरही रंगांचा प्रभाव त्यामध्ये होता?विशिष्ट काळाची पार्श्वभूमी होती की खाडिलकरांच्या नाट्य लेखन प्रवासातील विशिष्ट टप्पा होता?हा सगळा विचार हे नाटक समजावून घेताना अपरिहार्य ठरतो.

काळाची पार्श्वभूमी आणि खाडिलकरांचे व्यक्तिमत्व

नाटक हे समाजाच्या, राष्ट्राच्या संस्कृतीचा मानदंड आहे हे मत सर्व मान्य आहे. कथा, कादंबरी, काव्य या ललित वाङ् मयप्रकारापेक्षा नाटक या वाङ् मयप्रकाराला काळाचा संदर्भ अधिक असतो. कारण या नाटकाला असलेल्या दृश्य परिणामामुळे ते थेट लोकांना, प्रेक्षकांना भिडत असते.विशिष्ट काळातील प्रेक्षकांच्या मनोवृत्ती, विचार ,आशा ,आकांक्षा विशिष्ट प्रकारच्या असतात. नाट्यलेखनाच्या काळात अस्तित्वात असलेल्या प्रेक्षकवर्गाच्या मनाशी नाटकाच्या तारा जुळाव्या लागतात तरच ते नाटक उचलले जाते. याचे भान नाटककाराला ठेवावेच लागते.खाडिलकराना हे भान होते म्हणूनच त्यांच्या नाट्यदृष्टीचा अभ्यासकाला स्वतंत्रपणे अभ्यास करावा लागतो. भोवतालच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक वातावरणातूनच माणसे घडत असतात.वाचक-प्रेक्षक आणि कलावंतही आपल्या कृती- उक्तीतून आपले हे 'घडणे', आपली स्पंदने व्यक्त करीत असतात.प्रतिभावान साहित्यिक समाजमनातील अंतःप्रवाह जाणतात. आपल्या कलाकृतीतून व्यक्त करतात.म्हणून त्या कलाकृतींना भरगोस प्रतिसाद मिळतो. समाज, कलावंत, आणि कलाकृती या तिन्ही गोष्टींना काळाची पार्श्वभूमी किंवा संदर्भ असतो तो असा.

1907साली 'कीचकवध' लोकांसमोर आले ते वर्ष भारताच्या राजकारणातील अत्यंत धामधुमीचे वर्ष होते.1907च्या आगेमागे भारतीयांना हादरवून टाकणाऱ्या घटना घडल्या होत्या.पारतंत्र्याच्या शृंखलांचा काच तीव्र झाला होता.1905 मध्ये लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी केली, आणि भारतीय मनाचा प्रक्षोभ झाला. 1906 मध्ये दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली कलकत्त्याला काँग्रेसचे अधिवेशन झाले आणि लो. टिळकांची चतु:सूत्री ग्रेसने मान्य केली. ही चतु:सूत्री मवाळ पक्षाला अमान्य होती त्यामुळे जहाल-मवाळ यांच्यातील मतभेद तीव्र होत गेले. या सगळ्या घटनांशी त्यांच्या प्रतिक्रियांशी खाडिलकरांचा जवळून संबंध होता. ते लोकमान्य टिळकांचे जवळचे सहकारी होते.'केसरी'चे अग्रलेख ते लिहीत होते.जहाल क्रांतिकारकत्वाची धुरा घेतलेल्या खाडिलकरांच्या लेखांनी इंग्रज सरकार खडबडून उठले आणि 1908 साली लो. टिळकांवर राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना सहा वर्षाची काळ्यापाण्याची शिक्षा झाली. आणि याच वर्षी 'केसरी'वर संपादक म्हणून खाडिलकरांचे नाव घातले गेले. 1909 मध्ये जॅक्सनचा खून झाला. 1910 मध्ये वृत्तपत्रावर जाचक निर्बंध घालणारा प्रेसॲक्ट आला. खाडिलकरांच्या नाटकांचा अभ्यास करताना तत्कालीन राजकारणाची पार्श्वभूमी आणि खाडिलकरांचे व्यक्तिमत्व लक्षात घ्यावे लागते. खाडिलकर ही व्यक्ती,लो. टिळक आणि त्यांचे राजकीय तत्त्वज्ञान यांच्याशी पूर्णपणे एकरूप झालेली होती. लोकमताचा प्रवाह आपल्या बाजूला वळवून घेण्यासाठी 'केसरी'तील लेखनाचे साधन खाडिलकर वापरित होते. त्याचप्रमाणे त्याच हेतूपूर्तीसाठी 'नाटक' हे ही त्यानी साधन म्हणून निवडले. एका बाजूने केसरीतील लेखांच्या रूपाने वैचारिक, तात्विक असे उपहास,उपरोधपूर्ण लेखन आणि दुसऱ्या बाजूने नाटकांच्या रूपाने रंजन, बोध, प्रचार यांच्याद्वारे भावनाकल्लोळ निर्माण होईल असे कलात्मक लेखन त्यांनी केले.जुलमी राजवटीविरुद्ध लोकप्रक्षोभ निर्माण करणे, ही, खाडिलकरांच्या लेखणीची पहिली अट होती. त्यांच्या गद्य नाटकांच्या बाबतीत हे विधान पूर्णावशाने खरे आहे. संगीत नाटकांचा मात्र वेगळा विचार करावा लागतो. 'कीचक'वधाचे कथानक खडिलकरांनी निवडले यात व्यक्ती म्हणून आणि कलावंत म्हणून खाडिलकरांचे चातुर्य दिसून येते. शिवरामपंत परांजपे यांची 'वक्रोक्ती' आणि खाडिलकरांच्या 'कीचकवधा'चे राजकीय रूपक यांची जातकुळी या दृष्टीने एकच आहे.एक निबंधशैली आहे दुसरी नाट्यशैली आहे. विशिष्ट तत्त्वज्ञानाने आणि लोकमान्य टिळकांच्या विभूतीमत्वाने भारलेले व्यक्तिमन,काळाची पार्श्वभूमी आणि नाट्यकलेची जाण यामुळे खाडिलकरांनी 'कीचकवधा'चे पौराणिक कथानक निवडून त्याची स्वतंत्र, कलापूर्ण बांधणी केली. त्यातील नाट्याविष्कार हा नाटककार खाडिलकरांच्या नाट्यकर्तृत्वाचा कळसाध्याय ठरला.

' कीचकवध' : एक राजकीय रूपक ?

'कीचकवध' नाटकाच्या लोकप्रियतेचे मूळ त्यातील तत्कालीन राजकारणाच्या संदर्भात आहे असे मानले जाते. प्राध्यापक ना.सी. फडके १, प्राध्यापक गंगाधर गाडगीळ२, श्री.पु.रा.लेले ३ इत्यादींनी खाडिलकरांच्या नाटकासंबंधी जे लेखन केले आहे त्यात हा विचार स्पष्टपणे आला आहे.कीचकाच्या रूपात तत्कालीन प्रेक्षक लॉर्ड कर्झन पाहत असे. धर्माच्या रूपाने (कंक) मावळ पक्षीय, भीम, व द्रौपदीच्या (बल्लव व सैरंध्री) रूपाने जहाल पक्ष डोळ्यापुढे येत होता.द्रौपदीच्या(सैरंध्री) आणि पांडवांच्या अज्ञातवासातील कठीण अवस्थेचे साम्य पारतंत्र्यातील भारतीय जनतेशी जोडण्यात येत होते.कीचकवध नाटकाच्या उल्लेखाबरोबर भारतीय राजकारणाचा हा संदर्भ डोळ्यापुढे यावा इतका हा विचार रुजलेला आहे.परंतु इसवी सन 1986 मध्ये प्रसिद्ध झालेल्या श्री.विश्वनाथ खैरे यांच्या 'भारतीय मिथ्यांचा मागोवा' या पुस्तकातील

'कीचकवधाची पार्श्वभूमी' या लेखात पूर्वी प्रस्थापित झालेल्या विचारापेक्षा वेगळा विचार मांडलेला आहे. त्यांच्या मते 'कीचकवध' हे कर्झनशाहीवरील रूपक नसून नेपाळातील राणाशाही वरून खाडिलकरांना 'कीचकवध' नाटकाची प्रेरणा झाली. खाडिकर स्वतः रायफली बनविण्याचे शिक्षण घेण्यासाठी दोन वर्षे गुप्तपणे नेपाळमध्ये राहिले होते. त्यावेळी त्यांनी पाहिलेले तेथील राजकारण या नाटकात आलेले आहे. एक वेगळे मत म्हणून ते नोंदविणे आवश्यक ठरते पण प्रश्न असा आहे की 1907 सालापासून जी महाराष्ट्र जनता हे नाटक विलक्षण उत्सुकतेने पहाट होती,अस्वस्थ होत होती,त्या जनतेला हे नेपाळमधील राजकारण ज्ञात होते का? त्या राजकारणाशी जनतेचे काही भावनिक लागेबांधे होते का? या प्रश्नांची उत्तरे अर्थातच नकारात्मक आहेत.नेपाळमधील राणाशाहीपेक्षा भारतातील कर्झनशाहीने घातलेला घाव आणि त्यावर या नाटकाने दिलेले उत्तर हेच त्याच्या लोकप्रियतेचे आणि यशाचे मूळ कारण होते. या नाटकामुळे लोकक्षोभ होईल असे वाटल्यामुळे 1910 मध्ये इंग्रज सरकारने त्यावर बंदी आणली. राजकीय क्षेत्रात महत्त्वाचे कार्य करणाऱ्या खाडिलकराना भारतीय राजकारण आणि लोकजागृती यातच रस होता हे स्पष्ट आहे.
'कीचकवधा'चा लोकमानसावर जो परिणाम झाला तोच त्यांना अपेक्षित होता. भारतीय स्वातंत्र्य हा त्यांचा निदिध्यास होता. इसवी सन १८९६ पासून खाडीलकर लो.टिळकांच्या प्रभावाखाली होते. त्यांचे जहाल राजकारण कृतीत आणण्याच्या हेतूने ते नेपाळला गेले. नेपाळमधील राजकीय परिस्थितीचे विश्लेषण मनाशी त्यांनी केलेही असेल पण नाट्यरूपाने ते महाराष्ट्रातील लोकापुढे ठेवण्याचा विचार संभवनीय वाटत नाही.आपला प्रेक्षकवर्ग कोणता, त्याच्या आशाआकांक्षा कोणत्या हे न कळण्यासारखे खाडिलकर नवोदित नव्हते. 1907 पासून 1986 पर्यंत 'कीचकवध' नाटकाची समीक्षा होत राहिलेली दिसते ही गोष्ट अधिक महत्त्वाची आहे.

रंगभूमी मासिकात आलेले 'कीचकवध'चेपरीक्षण -

रंगभूमी मासिकातील 'स्फूटविवेचन' या सदरात (वर्ष एक, अंक एक, ऑगस्ट 1907) 'कीचकवध' वर लिहिताना लेखक म्हणतो "या सालात (1907) ज्यासंबंधाने काही लोकमत जागृत झाले आहे" अशी ही नाटके आहेत.'कीचकवध' व 'बायकांचे बंड' ही दोन 1907 साली प्रयोगरूपाने पुढे आलेली खाडिलकरांची नाटके होत. या दोन्ही नाटकांच्या बाबत हे मत व्यक्त केले गेले आहे. लेखकाने खाडिलकराना आणखी एक श्रेय दिले आहे. तो म्हणतो "पौराणिक कथाभाग घेऊन त्यावर आधुनिक विचारपद्धतीने नाटके लिहिण्याची कल्पना खाडिलकरानी काढली आहे असे म्हणण्यास हरकत नाही." खाडिलकराना 'प्रगतीतत्त्वाचे चाहते' असे म्हटले असून त्यांच्या नाटकापासून 'काही कार्यभाग' झाल्यावाचून राहणार नाही असा अभिप्राय व्यक्त केला आहे. या लहानशा लेखात खाडिलकरांच्या लेखनातील नाविन्य आणि त्यांच्या नाटकांचा जनमानसावर होत असलेला परिणाम एवढे दोनच महत्त्वाचे उल्लेख आहेत. प्रस्तुत अभिप्राय 'कीचकवध' नाटकाचा प्रयोग पाहून लिहिलेला आहे. परंतु नेमका कोणता प्रयोग पाहिला याचा उल्लेख नाही. पहिल्या प्रयोगानंतर सहा महिन्यांनी लिहिलेला हा अभिप्राय आहे. मधल्या काळात या नाटकाचे जितके प्रयोग झाले असतील त्यावरून लोकजागृतीच्या खुणा जाणवल्या असणार. हे नाटक खेचत असलेली गर्दी, लोकांना प्रतीक होत असलेला या नाटकाचा आशय, त्यामुळे मनावर होणारा परिणाम हे सारे 'नाटक' या कला प्रकाराकडे आस्थेने पाहणाऱ्या व्यक्तींच्या नजरेतून सुटणे शक्य नव्हते.'स्फूटविवेचन' या सदरातील या लेखाच्या लेखकाचे नाव छापलेले नाही. परंतु हा मजकूर बहुधा स्वतः संपादक लिहीत असत. संपादकांनी 'कीचकवध'

नाटकावर जी मते व्यक्त केली आहेत, ज्या पद्धतीने व्यक्त केली आहेत त्यावरून त्यांचे संपादकीय धोरण ध्यानात घेण्यासारखे आहे. 'कीचकवध' वर लिहिताना समकालीन राजकारणाचा उल्लेख त्यानी केलेला नाही. नाटकाच्या परिणामकारकतेच्या मूळ कारणाचा उल्लेख त्यांनी केलेला नाही. 'लोकमत जागृत' होणे याचे नेमके स्पष्टीकरण या विवेचनात नाही. प्रयोग पाहिल्यानंतर या नाटकाची खूप चर्चा सुरू झाली एवढ्याच अर्थाने हे शब्द आहेत की या नाटकाने लोकांना काही विशिष्ट विचार किंवा दृष्टिकोन दिला असे सुचित करावयाचे आहे? नाटकाच्या संदर्भात लोकमत जागृती वेगवेगळ्या प्रकारची असू शकते.नाटकाच्या आशयात, लोकांना पूर्वपरंपरेपासून दूर नेवून नव्या जाणीवा उत्पन्न करण्याची ताकद असू शकते. नाट्यप्रयोगाच्या मांडणीतूनही आशयदृष्ट्या व तंत्रदृष्ट्या वरच्या पातळीवरील कलात्मकता दाखवता येते. याचा लोकमानसावर व अभिरुची वर ठसा उमटू शकतो. एखाद्या सामाजिक, राजकीय प्रणालीचा यशस्वी पुरस्कारही नाटकाद्वारे केला जाऊ शकतो. त्यामुळेही लोकमत जागृत होऊ शकते. म्हणजे, नवी जीवन दृष्टी देणे, नवी कला दृष्टी देणे, एखाद्या सामाजिक किंवा राजकीय प्रश्नाबाबत नवी दृष्टी देणे यापैकी काहीही 'लोकमत जागृती'त येऊ शकते.बुद्धीला आव्हान देणारा व्यापक जीवनाशय,रसिकतेला आवाहन करणारे कलादृष्टी, काळाशी सुसंगत अशा सामाजिक किंवा राजकीय तत्वप्रणालीचा पुरस्कार यापैकी काही घडवून आणण्याची ताकद नाटकात असते. संपादकांनी 'लोकमत जागृती'चा नेमका अर्थ स्पष्ट केलेला नाही, त्याची त्यांना आवश्यकता वाटलेली नाही इतका तो त्याकाळी न सांगता समजण्याजोगा होता.

खाडिलकरांची 'आधुनिक विचारपद्धती' म्हणजे नेमकी कोणती ?पौराणिक कथाभागाची आधुनिकतेशी खाडिलकरानी कशी सांगड घातली आहे ? ही आधुनिकता आशयाची, तंत्राची की शैलीची याचे स्पष्टीकरण या विवेचनात नाही. रंगभूमीकारांना जी आधुनिकता अभिप्रेत होती तिचे प्रणेते एकटे खाडिलकरच होते एवढे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. खाडिलकरांच्या नाटकांच्या रूपाने मराठी नाटक पुढे गेले हे सुचित करून पुढील अभ्यासकांना त्यांनी नवी वाट दाखवली आहे.

खाडिलकरांच्या नाटकांपासून 'काही कार्यभाग झाल्यावाचून' राहणार नाही असेही त्यांनी म्हटले पण 'कीचकवध' च्या प्रयोगांचा त्याकाळी नेमका कोणता परिणाम होत होता व नेमका कोणता 'कार्यभाग' व्हावा असे रंगभूमीकारांना वाटत होते, ते त्यांनी लिहिलेले नाही. याचे कारण ते 1907 साल होते, हेच होते. काही देशहित साधावयाचे असेल तर लेखणीला लगाम घालणे हे दूरदृष्टीचे द्योतक होते. संपादकांचे पहिले इमान रंगभूमीच्या, मराठी नाटकांच्या उन्नतीशी होते. त्याच्याशी हे धोरण सुसंगत होते.नाटकाचा प्रयोग पाहून लिहिलेल्या या तोटक अभिप्रायात प्रयोगाच्या गुणदोषांविषयी, परिणामकारकतेविषयी, नटांच्या अभिनयाविषयी काहीच उल्लेख नाही. हा मजकूर म्हणजे विस्तृत नाट्यपरीक्षण नव्हे हे खरे पण प्रयोग पाहून केलेल्या या विवेचनात प्रयोगविषयक तपशील येणे आवश्यक होते.

रंगभूमी मासिकाच्या पुढच्या अंकात (वर्ष एक, अंक दोन /तीन सप्टेंबर- ऑक्टोबर 1907) 'स्फूटविवेचन' या सदरात 'कीचकवध' पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाल्यावर त्यावर लिहिले आहे. त्यामध्ये खाडिलकरांच्या नाटकाची आणखी वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत, ती म्हणजे नाट्यप्रसंगांची योजना आणि स्वभावचित्रणाचे कौशल्य. संगीत नाटकांची आवड असणाऱ्या रसिकांना गद्य नाटककृतीची गोडी लावण्याचे कार्य खाडिलकरांनी केले असेही संपादक म्हणतात.कीचकाच्या व्यत्तिरेखेत नवा प्राण ओतला म्हणूनच ती व्यक्तिरेखा मनाची पकड घेणारे ठरली. तिला नवे संदर्भ प्राप्त करून दिल्यामुळे प्रयोगातील तिचे रूपही

बदलले. वीस वर्षांपूर्वी हाच कीचक शकाराच्या पद्धतीने उभा केला जात असे याची आठवण करून दिली आहे.खाडिलकरांच्या नाटकातील नाट्यमयता,व्यक्तिचित्रणे,याबरोबरच रसवत्तेचाही गौरव या परीक्षणात केला आहे.खाडिलकरांची नाटके स्वतंत्र असून ती शेक्सपिअरच्या तोडीची आहेत असे मत व्यक्त केले आहे.

रंगभूमी मासिकातील 'कीचकवध' वरील या दोन स्फूट लेखात प्रयोगसमीक्षा आणि संहितासमीक्षा यांची बाल्यावस्थेतील पण तरीही नेमके मर्म जाणणारी रूपे दिसतात.लेखकाची चोखंदळदृष्टी, ऐतिहासिकतेचे असलेले भान, त्याची नाट्यविषयक समज किती प्रगल्भ होती हेच दर्शवितात. खाडिलकरांच्या नाटकांच्या संदर्भातील खालील महत्त्वाचे मुद्दे या लहानशा दोन लेखात आलेले आहेत.

1 खाडिलकरांच्या नाटकात असलेली लोकमत जागृत करण्याची ताकद.
2 पौराणिक कथानकांकडे आधुनिक दृष्टीने पाहणे हे खाडिलकरांचे वैशिष्ट्य
3 खाडिलकरांनी आशय आणि तंत्रदृष्ट्या मराठी नाटक पुढे नेले.
4 खाडिलकरांच्या नाटकातील हेतू प्रधानता.
5 खाडिलकरांच्या नाटकातील नाट्यप्रसंगांची योजना
6 खाडिलकरांचे स्वभाव चित्रणातील कौशल्य.
7 खाडिलकरांच्या नाटकातील रसवत्ता.
8 मराठी रसिकतेचा ओघ संगीत नाटकांकडून गद्य नाटकांकडे वळविण्यात खाडिलकराना आलेले यश.

खाडिलरांच्या नाटकांची आजतागायत जी समीक्षा झालेली आहे, त्या सर्व समीक्षालेखात हेच मुद्दे अधिक विस्तृत रीतीने प्रभावीपणे मांडण्यात आलेले आहेत असे दिसते. पुढच्या काळात त्यातील राजकीय रूपकांची चर्चा स्पष्टपणे झाली. पुढल्या काळात समीक्षेच्या विविध शाखा उदयाला आल्या त्यानुसार नाट्यचर्चेची मांडणी बदलली पण अखेर हाती आलेला बहुतेक आशय रंगभूमिकारांच्या मुद्द्यांशी मिळताजुळताच आहे हे रंगभूमी मासिकाचे श्रेय महत्वाचे आहे.समकालीन कलाकृतीवरील समीक्षेला काही मर्यादा अपरिहार्यपणे पडत असतात. पण कलाकृतीतील प्राणतत्वाला स्पर्श करता येणे हे महत्त्वाचे असते आणि रंगभूमीकारांनी हे अचूकपणे केले आहे म्हणून त्यांचे लेखन आजही महत्त्वाचे वाटते. काही विधानांबाबत आज मतभेद जरूर होईल. उदाहरणार्थ खाडिलकरांची नाटके स्वतंत्र असून ती शेक्सपिअरच्या तोडीची आहेत असे मत रंगभूमीकारानी रंगभूमीच्या वर्ष एक, अंक दोन /तीन सप्टेंबर -ऑक्टोबर 1907 मधील अंकात व्यक्त केले आहे.खाडिलकरांची नाट्यशैली शेक्सपीरीयनन तंत्राचा अवलंब करणारी होती एवढेच सत्य आज आपण मान्य करू शकतो.

खाडिलकरांची गद्य नाटके 1901 पासून रंगभूमीवर येऊ लागली.1901 मध्ये 'कांचनगडची मोहना' हे नाटक महाराष्ट्र नाटक मंडळीने रंगभूमीवर आणले आणि खाडिलकरांच्या गद्य नाटकांची परंपरा सुरू झाली.सुशिक्षितांवर असलेला शेक्सपीअरचा प्रभाव,त्या धर्तीच्या नाटकांची त्यांना वाटत असलेली ओढ खाडिलकरांनी जाणली आणि त्याला ध्येयवादित्वाची, लोकशिक्षणाची जोड देऊन नाटक हे साधन बनविले. नाटक हे खाडिलकरांच्या देशाभिमानी वृत्तीचे हेतुप्रधान पण कलात्मक रूप ठरले. प्रतिभेचा स्पर्श लाभल्यामुळे

काळाच्या ओघात मूळ संदर्भ बदलले तरी त्यातील नाट्यगुणांमुळे टिकून राहिलेले महत्त्वाचे नाटक म्हणजे कीटकवध.

'रंगभूमी' मासिकात व्यक्त झालेला खाडिलकरांचा नाट्य विषयक दृष्टिकोन -

रंगभूमी मासिकाच्या पहिला अंक ऑगस्ट 1907 मध्ये निघाला. त्या अंकाला खाडिलकरांनी प्रस्तावना लिहिलेली आहे. त्यामध्ये त्यांचा नाट्यकलेविषयीचा दृष्टिकोन व्यक्त झाला आहे. नाटकाची समाजात बरीच चर्चा होऊ लागली आहे याचा अर्थ नाट्यविषयक आस्था वाढली आहे. याचे कारण शोधून 'समाजाला स्वकर्तव्याविषयी निरंतर जागृत' ठेवावयाला हवे असे ते म्हणतात. येथे त्यांची लोकशिक्षकाची भूमिका स्पष्ट होते. नाटक हे केवळ मनोरंजनार्थ नाही. त्याना या कलेच्या माध्यमातून बौद्धिक जागृती अभिप्रेत आहे. टीका हा स्वतंत्र लेखच असतो.असाही विचार त्यांनी मांडला आहे. सर्जनशील टीका हीच खरी टीका हा मोलाचा विचार येथे आला आहे.नाटकाचा हेतू, परिणाम, नाट्यकृतीची समीक्षा याबाबतची महत्त्वाची तत्त्वे या प्रस्तावनेत येऊन जातात. नाट्यरचनेसंबंधीच्या वादांकडेही त्यांनी येथे लक्ष वेधले आहे. संस्कृत इंग्रजी नाटकांच्या बाबत हे वाद होत असत पण मराठी रसिकापर्यंत ते पोहोचत नसत. रंगभूमीसारख्या मासिकाने हे कार्य करावे असे ते सुचवितात.नाट्यप्रयोगावरील परीक्षणांचे महत्त्व सांगून हे मासिक नाटक व नाटकांचे प्रयोग या संबंधाने योग्य 'लोकमत जागृत करणारे साधन ठरावे' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे याचे कारण त्यांना अशा तऱ्हेच्या साधनांचा अभाव जाणवत होता.खाडिलकरांच्या या प्रस्तावनेचा परामर्ष येथे घेण्याचे एक कारण त्यात व्यक्त झालेल्या विचारांचा अनुबंध त्यांच्या नाट्यदृष्टीशी, नाट्यरचनेशी आहे. ही त्यांची दृष्टी, त्यांच्या प्रतिभेची जात आणि ताकद रंगभूमीकारांनी ओळखली हे महत्त्वाचे आहे.'कीचकवध' रंगभूमीवर आल्यावर सहा महिन्याच्या आत त्यावर लिहिलेल्या परीक्षणात त्याच्या पाऊलखुणा दिसतात हे रंगभूमी मासिकाचे ऐतिहासिक कार्य आहे.